MHBI120003782017

नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०१७ मधील निशाणी क्रमांक ७० वर आदेश
(सीएनआर : एमएचबीआय१२–०००३७८–२०१७)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा दिनांक ०९/०२/२०२२ रोजीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द करून मिळावा याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, सन २०२० मध्ये कोरोना महामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाउन झाल्यामुळे प्रकरण परत केंव्हा सुरू झाले याची कोणतीही कल्पना नसल्यामुळे व ते केज तालुक्यातील रहिवाशी असल्यामुळे साक्षीपुरावा घेण्याची तारीख त्यांना माहीत नव्हती. त्यामुळे ते प्रकरणात मागील तारखेस हजर राहु शकले नाहीत व तारीख वाढवून देणेबाबत अर्ज देवू शकले नाहीत. जर उपरोक्त प्रतिवादी यांना उलटतपासणीची संधी दिली गेली नाही तर उपरोक्त प्रतिवादी यांचे अतोनात व कशानेही भरून न येणारे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा दिनांक ०९/०२/२०२२ रोजीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द करून मिळावा अशी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून प्रस्तुत प्रकरण हे खूप जुने आहे. प्रकरणात प्रतिवादी यांना मागील तारखेस शेवटची संधी दिली होती. प्रकरणात प्रतिवादी यांना उलटतपास घेण्याची पूर्ण संधी देवून प्रकरणात नो क्रॉसचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी हे जाणीपर्वूक वेळकाढूपणा करत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करून प्रकणात जास्तीत जास्त रू. २०००/– कॉस्ट करण्यात यावी.

४. अर्ज व त्यावरील वादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जातील कारणांचा विचार केला असता तसेच वादी व उपरोक्त प्रतिवादी यांच्या दरम्यान प्रस्तुतचा दावा खरेदीखत क्र. ०८/२००६ रदद करण्याबाबतचा आहे. उपरोक्त प्रतिवादी यांना साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी दिल्यास दाव्याच्या गुणदोषावर निकाल करणे शक्य होणार आहे. तथापी त्याचवेळी दाव्याचे काम चौकशीसाठी प्रलंबित असताना उपरोक्त प्रतिवादींनी सदरचा अर्ज देवून दाव्याचे कामी केलेल्या विलंबाबत वादीस खर्चाची रक्कम वसुल होवून मिळणे देखील न्यायाचे व गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता वादीस खर्चाची रक्कम रू. ५००/— प्रतिवादी क्र. ३ यांनी देणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## आदेश

१) सदरचा अर्ज (निशाणी क्र. ७०) प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीस खर्चाची रक्कम रू. ५००/— देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. ३ यांचे विरूध्द दिनांक ०९/०२/२०२१ रोजी वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रददबातल करण्यात येत आहे.

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2022.05.05 17:56:40 +0530

दि. ०५.०५.२०२२
स्थळ: धारूर

(रा. व. कदम)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
धारूर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द—नि—शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | ०५.०५.२०२२ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०५.०५.२०२२ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ०५.०५.२०२२ |

**सही/—**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड—३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर